# दीड वर्षापासून पोलिसांना सापडत नसलेल्या अर्चना कुटे झुम मिटिंग घेतात; मात्र पोलिसांना सापडत नाहीत..!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564




■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २१६ ■ गुरूवार दि.२४ एप्रिल २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 216 ■ Thursday Dt.24 April 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# पोलिसांच्या वरदहस्तामुळेच अर्चना कुटे दीड वर्षापासून फरार; पोलिसांनी मनावर घेतलं तर अर्चना कुटेला अटक होईल!

## पोलीस उपअधीक्षक गोल्डे यांनी अर्चना कुटे यांना पोलीस बंदोबस्तात पोलीस अधीक्षक कार्यालयातून दिले होते काढून? एका ग्रुपच्या माध्यमातून ठेविदारांची झूम मीटिंग; झूम मीटिंगमध्ये कुटे यांनी केली पुन्हा एका ठेवीदाराची दिशाभूल?

- दीड वर्षापासून पोलिसांना सापडत नसलेल्या अर्चना कुटे झूम मीटिंग घेतात कशा?
- ज्यावेळी सुरेश कुटे यांना अटक झाली होती त्याचवेळी अर्चना कुटे यांनाही अटक करणे गरजेचे होते?
- अर्चना कुठे यांना फरार होण्यासाठी पोलीस उपअधीक्षक गोल्डे यांनी मदत केली असल्याची चर्चा?
- अर्चना कुटे सोबत पोलीस प्रशासनाने आर्थिक तडजोड केल्याचा सचिन उबाळे यांचा आरोप
- आर्थिक दिवाळखोरीत निघालेल्या ज्ञानराधाच्या अर्चना कुटे तब्बल दीड वर्षभरापासून फरार?
- अर्चना कुटे यांच्यावर काही ठेवीदारांनी प्रश्नांची तोफ डागली; अटक करण्याची ठेवीदारांची मागणी!

बीड । प्रतिनिधी

तिरूमला उद्योग समूहाचे प्रमुख सुरेश कुटे, अर्चना कुटे यांनी मोठा गाजावाजा करून ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह शाखेचा शुभारंभ केला. शाखेमध्ये पैशाची गुंतवणूक केल्यास मोठ्या प्रमाणावर व्याज देण्याचे आमिष दाखवून गोरगरीब कष्टकरीसह छोट्या मोठ्या व्यापाऱ्यांकडून मोठी रक्कम जमा करून घेतली.परंतु, काही खातेदारांनी मागील एक वर्षापासून पैसे परत घेण्यासाठी शाखेचे उंबरठे अनेक वेळा झिजविले. या बँकेच्या शाखेत पैसे परत मिळण्याची आशा मावळल्यामुळे फसवणूक झालेल्या खातेदारांनी थेट तक्रारी दाखल केल्या आहेत जादा व्याजदराचे आमिष दाखवून ज्ञानराधा मल्टी स्टेट को-ऑपरेटिव्हच्या शाखा अंतर्गत कोटयावधी रुपयाचा गंडा घातल्याचा संशय आहे. यामध्ये ३ कोटी ६९ लाख ८० हजार रुपयांची





फसवणूक केल्या प्रकरणी तक्रार दाखल केली होती. मात्र, आता या गुन्ह्याचा तपास छत्रपती संभाजीनगर ग्रामीण आर्थिक गुन्हे शाखा यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे.

बहुचर्चित ज्ञानराधा मल्टीस्टेट चे अध्यक्ष सुरेश कुटे यांच्या पत्नी आणि कुटे ग्रुपच्या चेअरमन अर्चना कुटे यांच्यावर बीड येथील ज्ञानराधा पतसंस्थेच्या सुमारे अडीच ते ३ हजार कोटींच्या घोटाळ्याप्रकरणी गुन्हे दाखल झाले आहेत. दीड वर्षापासून पोलीस त्यांच्या शोधात आहेत मात्र अर्चना कुटे पोलिसांना सापडत नाही. विशेष म्हणजे ज्यावेळी सुरेश कुटे यांना अटक झाली होती. त्याचवेळी अर्चना कुटे यांनाही अटक करणे गरजेचे होते. मात्र बीडचे पोलीस उपअधीक्षक विशवांभर गोल्डे यांनी याच अर्चना कुटे यांना पोलीस बंदोबस्तात पोलीस अधीक्षक कार्यालयातून काढून दिले होते.

पान २ वर

### जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लवकरच आंदोलन : सचिन उबाळे

दिवाळखोरीत निघालेल्या मेंढराला सह सर्वच पतसंस्था मल्टीस्टेट प्रकरणी सुरुवातीपासून महाराष्ट्र ठेवीदार कृती समितीच्या माध्यमातून आम्ही आंदोलनातून आवाज उठविला. यामुळे जवळपास सर्व चेअरमन, संचालक यांना अटक करण्यात आली आहे. महाराष्ट्र ठेवीदार कृती समितीच्या माध्यमातून १ हजार ६८ गुन्ह्यांचे पीटिशियन न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. एमपीआयडीचा प्रस्ताव दाखल झाल्यानंतर कुटेंच्या सर्व प्रॉपर्टीचा लिलाव होऊन ठेवीदारांच्या ठेवी परत मिळतील. दरम्यान आमचे आंदोलन कुठेही भरकटणार नाही. आंदोलन थांबलेले नाही. ठेवीदारांच्या प्रश्नासाठी येत्या आठ दिवसात पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पालकमंत्र्यांनी दखल घ्यावी असे तीव्र आंदोलन करणार असल्याचे सचिन उबाळे म्हणाले.

### गेवराईतील श्री मंगलनाथ मल्टिपल निधी बँक एक महिन्यापासून बंद ?

गेवराई शहरात कुलकर्णी प्लाझा येथे असलेल्या श्री. मंगलनाथ मल्टिपल निधी अर्बन हि बँक एक




महिन्यापासून बंद असून, चेअरमन केशव शेषनारायण पंडित हे गेल्या अनेक दिवसांपासून आजारी असल्याचे कारण दाखवून फरार आहेत. यामुळे खातेदार व ठेवीदार चिंतेत आहेत. खातेदारांची रक्कम तसेच ठेवीदारांची ठेवी बँकेत अडकल्यामुळे अनेकांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. सध्याच्या परिस्थितीत सदरील श्री. मंगलनाथ मल्टिपल निधी अर्बन बँक ही बंद आहे त्यामुळे खातेदारांसह ठेवीदार दररोज या बँक समोर चकरा मारत आहेत. या संस्थेत पिग्मीच्या विड्रॉल सह, खातेदारांची गोल्ड लोन मोठ्या प्रमाणात अडकले आहेत तसेच या संस्था चालकांनी काही लोकांचे सोने खाजगी सावकाराकडे दिलेले आहे अशी प्राथमिक माहिती मिळाली आहे. बँकेत जमा केलेले सोने खाजगी सावकाराकडे देणे कितपत योग्य आहे यांचीही सखोल चौकशी करावी संबंधित चेअरमन अनेक दिवसांपासून फरार असल्यामुळे ही गेल्या एक महिन्यापासून बँक बंद असल्याचे दिसून येत आहे. खातेदारांचे लाखो रुपयांची रक्कम या शाखेत अडकले आहेत. त्यामुळे आत्महत्या करण्याची वेळ असल्याचे खातेदार वर्गातून बोलले जात आहे. संबंधित चेअरमन हे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे बोलले जात आहे. चेअरमन हे खातेदार व ठेवीदारांच्या माध्यमातून स्वतःचाच फायदा करून घेतला असल्याने ठेवीदारांसह खातेदार मोठ्या अडचणीत सापडले आहेत. संबंधित चेअरमनसह संचालक मंडळ यांच्यावर एमपीआयडीचा प्रस्ताव दाखल करून सर्व प्रॉपर्टीचा लिलाव होऊन ठेवीदारांच्या ठेवी व खातेदारांची रक्कम परत मिळावी अशी मागणी होत आहे. तसेच या प्रकरणी महाराष्ट्र ठेवीदार कृती समितीचे मुख्य प्रवर्तक सचिन उबाळे यांनी लक्ष घालून आवाज उठवा अशी देखील मागणी ठेवीदारांसह खातेदार वर्गाकडून होत आहे.

## महालक्ष्मी कला केंद्र येथे चालणाऱ्या वेश्या व्यवसायावर पोलीसांचा छापा; मॅनेजरला बेड्या

बीड । प्रतिनिधी

महालक्ष्मी लोकनाट्य सांस्कृतीक कला केंद्र, उमरी शिवार, ता. केज येथे सदर कला केंद्राचे चालक, मालक व मॅनेजर हे काही महीलांकडून स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी वेश्या व्यवसाय करीत असल्याची गोपनीय माहीती मिळाली होती. त्यावेळी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत (भा.पो.से.) यांनी नियंत्रण कक्षाचे सपोनि मधुसुदन घुगे, अनैतीक मानवी व्यापार प्रतिबंध कक्षाच्या सपोनि श्रीमती वर्षा व्हगाडे व त्यांचे पथकाला सदर ठिकाणी छापा टाकण्याचे आदेशीत केले. त्यावरुन सदर पथकाने आज दिनांक २४/०४/२०२५ रोजी मध्यरात्री ३:३० वाजेच्या सुमारास एक



डमी ग्राहक व दोन पंचांसह सदर ठिकाणी सापळा रचून छापा टाकला असता सदर ठिकाणी महालक्ष्मी कला केंद्राचा मॅनेजर हा सदर कला केंद्रात १० महीलांकडून स्वतःचे आर्थीक फायद्यासाठी वेश्या व्यवसाय करवून घेतांना मिळून आला. सदर ठिकाणाहून १० पिडीत महीलांची सुटका करण्यात आली असून सदर कला केंद्राचा मॅनेजर मयूर बाबुराव अंधारे यास ताब्यात घेण्यात आले आहे. सपोनि मधूसुदन घुगे यांचे फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन केज येथे १) महालक्ष्मी लोकनाट्य सांस्कृतीक कला केंद्राचे मालक १) सत्वशीला बाबासाहेब अंधारे रा. स्वरसंगम कॉलनी, बीड, ह.मु. सावंतवाडी (उमरी) ता. केज जि. बीड, महालक्ष्मी लोकनाट्य सांस्कृतीक कला केंद्र चालवणारे २) आदित्य सत्वशीला अंधारे, रा. स्वरसंगम कॉलनी, बीड, ह.मु. सावंतवाडी (उमरी) ता. केज जि. बीड, महालक्ष्मी लोकनाट्य सांस्कृतीक कला केंद्राचे मॅनेजर ३) मयूर बाबुराव अंधारे रा. उदयनगर, धारुर ता. धारुर

पान २ वर

## नगरपरिषदेत 'आओ जाओ, घर तुम्हारा'; अधिकारी-कर्मचाऱ्यांवर नाही नियंत्रण

### मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांचे बाहेरगावी दौरे थांबेनात?

गेवराई । प्रतिनिधी

प्रशासकीय कामांचा पाच दिवसांचा आठवडा केल्यानंतर कामाचे तास वाढविले असतानाही नगर परिषदेमध्ये मात्र कामावर येण्याचा व जाण्याचा वेळ फार कोणी पाळत नाही. अधिकाऱ्यांसह कर्मचारीही केव्हाही येतात आणि जातात. त्यामुळे गेवराई नगर परिषद कार्यालयातील चित्र 'आओ जाओ, घर तुम्हारा' सारखे दिसते. त्यामुळे नगरपरिषदेच्या भवनातील वेगवेगळी कार्यालये ओस पडलेली असतात, त्यामुळे कामानिमित्त आलेल्या




नागरिकांना ताटकळत थांबावे लागते.

त्याचसोबत कार्यालयीन कामकाजाचे तास वाढवून कार्यालयात येण्याची वेळ सकाळी ९.४५ आणि घरी जाण्याचा वेळ संध्याकाळी ६.१५ केला आहे. शिपाई सेवकांनी पंधरा मिनिटे अगोदर येणे बंधनकारक आहे. मात्र, अनेक अधिकारी व कर्मचारी सकाळी उशिरा कार्यालयात येतात, तर सायंकाळी पाच

पान २ वर

# डझन भर नगरसेवक पाणी स्वच्छता लाईटसाठी सि.ओ.च्या कॅबिनमध्ये घुसले

## ११ महिने झोपणारी न.प.ने भर उन्हाळ्यात पाइपलाइन दुरूस्ती सुरू केली

बीड । प्रतिनिधी

सध्या उन्हाळा सुरू आहे तापमान ४० ते ४२ अंशावर गेलेले दिसून येत आहे उन्हामुळे पिण्यासाठी पाणी जास्त लागत आहे असे असतानाही बीड नगरपरिषदे ने शहरात १५ ते २० दिवसाला तर काही ठिकाणी २२ दिवसाला पिण्याचे पाणी मिळत आहेत त्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी भटकावे लागत आहे असे असतानाही ऐन उन्हाळ्यात पाइपलाइन लिकेज् दुरूस्तीचे आणि जोडाजोडीचे काम सुरू केले आहेत. पाणीपुरवठा लवकरात लवकर करून पाणी सुरळीत करावे व ज्याठिकाणी पाइपलाइन नाही किंवा पाणी येत नाहीत असे ठिकाणी टँकर ने पाणी द्यावे, बीड शहरात घाणीचे साम्राज्य पसरलेले आहेत पावसाळ्यापूर्वीच बीड शहरातील मुख्य नाले व गटरांची साफसफाई करून घ्यावी व स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे, सहा सहा ते आठ आठ महिने पासून पथदिवे बंद पडलेले आहेत गल्ली बोळात अंधेरा



पसरल्यामुळे लोक रस्त्यावर पडून त्यांना दुखापत होत आहे म्हणून प्रत्येक खंब्यावरचे लाईट चालू करून घ्यावे या मागणीसाठी आज सर्व पक्षीय नगरसेवकांनी हे एकत्र येऊन मुख्याधिकारी श्रीमती अंधारे यांच्या कॅबिन मध्ये घुसले होते. सविस्तर चर्चा झाल्यानंतर मुख्याधिकारी श्रीमती अंधारे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तंबी देत सदर सर्व प्रश्न मार्गी लागेल असे आश्वासन सर्व नगरसेवकांना दिले आहे.

या शिष्टमंडळामध्ये खुर्शीद आलम, सैय्यद सादेउजमा, दत्ता जाधव, सैय्यद इलियास, जलील खान, जैतुल्ला खान, आमेर अण्णा, मुन्ना इनामदार, संजय उडान, एकबाल भाई, बाबा मेंबर, शेख अश्फाक, लक्ष्मण इटकर, गुड्डो मेंबर, मुजीब एवन, फय्याज मन्यार, शाहनवाज खान, आमेर इनामदार, अमोल अहिरे, सोनु पटेल, कौसर भाई, शहेबाज मोमीन यांच्यासह अनेक जेष्ठ नागरिक मा. नगरसेवक आणि समाजसेवक उपस्थित होते.

# भीमज्योती जन्मोत्सवात: ऑर्केस्ट्राचा थरार अन् सळसळती तरुणाई!

### संपला नाही अन् संपणार नाही शितलताईचा दरारा गाण्यांवर थिरकली, धोंडराईच्या भिमचाहत्यांची मोठी गर्दी

गेवराई । प्रतिनिधी

आले किती गेले किती उडून गेला भरारा... कधी संपला नाही अन् संपणार नाहीशितलताईचा दरारा अशा तरुणाईच्या हृदयावर छाप टाकणाऱ्यां एकापेक्षा एक गाण्यावर तरुणाई बेभान होऊन नाचत होती. त्याने आपल्या आवाजात सादर केलेल्या भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील ''भिमगिते '' ओ भिमवाले' कुंकू लावील रमानं तसेच 'जिथे गाव तिथे भीमराव' भीमराव आणि रमाईच्या आठवणींची या गाण्यांनी तर तरुणाई मैदान डोक्यावर घेतले. भीमज्योती जयंती उत्सव हजारो चाहत्यांच्या गर्दीने हाऊसफुल्ल ठरला.



सविस्तर वृत्त असे की क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती २३ मार्च रोजी सायंकाळी सात वाजता धोंडराई गावात विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी करण्यात आली. यावेळी येथील बुद्धविहारामध्ये सामुदायिक बुद्धवंदना, प्रतिमेची शोभायात्रा काढण्यात आली.यावेळी ठिकठिकाणी माझा भीमराव लय दिलदार तुला फुकट दिले सार, उद्धारले बहुजन भिमा तुम्हामुळे या भीम गीतांमुळे गावात वातावरण भारावून गेले होते. तरुणाईने ऑर्केस्ट्राच्या तालावर ठेका धरत जल्लोष केला. यावर अख्खी तरुणाई थिरकली. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी भीमसागर उसळला होता. अभिवादन करण्यासाठी विविध जाती धर्माचे नागरिक राजकीय पुढारी पक्ष संघटनाच्या कार्यकर्त्यांनी सकाळपासून गर्दी केली होती. दरम्यान ठीक ठिकाणी आरोग्य तपासणी रक्तदान शिबिरे फळवाटप पाणी वाटप यांसह विविध उपक्रम राबविण्यात आले होते.

पान १ वरून...

## पोलिसांच्या वरदहस्तामुळेच अर्चना कुटे दीड वर्षापासून फरार...

त्यानंतर हेच पोलीस पुन्हा अर्चना कुटेंचा शोध घेत होते. आता तर अर्चना कुटे यांनी कहर केला असून त्यांनी काही ठराविक ठेवीदारांची २१ एप्रिल २०२५ रोजी झुम मीटिंग घेतली असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र ठेवीदार संघर्ष कृती समितीचे मुख्य प्रवर्तक तथा स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष सचिन उबाळे यांनी केला आहे. आर्थिक दिवाळखोरीत निघालेल्या ज्ञानराधा मल्टीस्टेट प्रकरणी सुरेश कुटे सध्या कारागृहात आहेत. तर अर्चना कुटे यांच्यावर गुन्हे दाखल झाले असून त्या दीड वर्षापासून फरार आहे. त्या अध्यापही पोलिसांना सापडल्या नाहीत असे असताना. दि.२१ एप्रिल रोजी कुटे यांच्या संपर्कात असलेल्या ठेवीदारांनी एका ग्रुपच्या माध्यमातून ठेवेदारांची झुम मीटिंग आयोजित केली आणि याच मीटिंगमध्ये आरोपी असलेल्या अर्चना कुटे यांनी ठेवीदारांशी संपर्क साधून पुन्हा एका ठेवीदारांची दिशाभूल केली. झूम मीटिंगमध्ये कुटे यांच्यावर काही ठेवीदारांनी प्रश्नांची तोफ डागली. तेव्हा प्रश्न विचारणाऱ्या ठेवीदारांना मीटिंग मधून रिमूव्ह करण्यात आले. या ठेवीदारांनी माझ्याशी संपर्क केला असल्याचे उबाळे यांनी सांगितले आहे. दीड वर्षापासून पोलिसांना सापडत नसलेला अर्चना कुटे झुम मीटिंग घेतात. मात्र पोलिसांना माहिती होत नाही. यावरून पोलीस प्रशासनाने आर्थिक तडजोड केल्याची दिसून येत आहे.

**लवकरच पोलीस अधीक्षकांची भेट घेणार : उबाळे**

अर्चना कुटे यांनी झूम मीटिंगच्या माध्यमातून ठेवीदारांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. ही मीटिंग २१ एप्रिल रोजी झाली. यासंदर्भात लवकरच पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांची भेट घेऊन अर्चना कुटेंच्या मीटिंगमध्ये कोण कोण सहभाग होते. ही मीटिंग कोणी अरेंज केली यात अर्चना कुटे असतील तर सायबरच्या माध्यमातून याचा तपास करून लवकरात लवकर अर्चना कुटे यांना अटक करावी व झूम मीटिंग आयोजकांवर कारवाई करावी अशी, मागणी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांची भेट घेऊन त्यांच्याकडे करणार असल्याचे सचिन उबाळे यांनी बोलताना सांगितले.

## महालक्ष्मी कला केंद्र येथे चालणाऱ्या वेश्या व्यवसायावर पोलीसांचा छापा

यांचेविरुद्ध गु.र.नं. १८६/२०२५ कलम ३,४,५,६ स्त्रीया व मुली अनैतीक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६, कलम १४३ भारतीय न्याय संहीता प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीक कॉवत (भा.पो.से.) यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि. मधुसुदन घुगे नियंत्रण कक्ष, स.पो.नि. वर्षा व्हगाडे अनैतीक मानवी व्यापार प्रतिबंध कक्ष, पो.ह./१६८२ बहीरवाळ नेमणूक पिंपळनेर पो.स्टे., पो.ह./२४२ शिंदे नेम. अ.मा.व्या. प्र. कक्ष, पोना/२३४ अविनाश घुंगर्ड, पोशि/१९२७ शुभम घुले, मपोशि/६३ अर्चना वंजारे, मपोशि/१८७६ भाग्यश्री खांडेकर नेमणूक आर.सी.पी. यांनी केली आहे.

## नगरपरिषदेत 'आओ जाओ, घर तुम्हारा'...

वाजल्यापासूनच घरी जाण्यास सुरुवात करतात, वरिष्ठांना कल्पना न देता कार्यालयातून गायब होतात, असे दिसून येत आहे. दैनंदिन कामकाजासाठी नगरपालिकेत येणाऱ्या गेवराई करांना अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या मनमानी कारभाराचा फटका सहन करावा लागत आहे. अनेक कार्यालयांमध्ये उपस्थित कर्मचारी घोळका करून तासन् तास गप्पा मारत बसतात. याशिवाय अनेक महिला कर्मचारी मोबाईलवर टाइमपास करतात, तासन् तास वेळ वाया घालवतात त्यामुळे कामे घेऊन येणार्यांना ताटकळत थांबून अनेकवेळा रिकाम्या हाती जावे लागत आहे. पुन्हा कर्मचारी एकत्र चहासाठी जातात. साडेपाच वाजेपासूनच कामकाज बंद करतात. म्हणजे दुपारच्या सत्रातही दीड ते दोन तासांपेक्षा अधिक काम केले जात नाही. त्यामुळे दिवसभरात केवळ तीन ते साडेतीन तास काम केले जात आहे.

याबाबत मुख्याधिकारी साहेब नेमकं काय चाललंय? असा प्रश्न पडतो म्हणून काही नागरिक सकाळी दहा वाजून ४१ मिनिटापर्यंत कर्मचाऱ्यांची वाट पाहत बसले होते. मुख्याधिकारी महोदय दोन-चार दिवसाला एकदा कार्यालयात उपस्थित राहतात याच मुद्द्यावरून असे परिणाम कर्मचाऱ्यावर होतात की काय अशी चर्चा सुरू आहे. कुठलाही वरिष्ठ अधिकाऱ्यांचा वचक या कार्यालयात न राहिल्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. याकडे आमदार विजयसिंह पंडित यांनी लक्ष घालावे अशी मागणी होत आहे.

## श्री स्वामी समर्थ महाराजांचा पुण्यतिथी सप्ताह उत्साहात सुरू

धारूर । प्रतिनिधी

श्री स्वामी समर्थ सेवा अध्यात्मिक विकास आणि बालसंस्कार केंद्र किल्ले धारूर, येथे श्री स्वामी पुण्यतिथी सप्ताह निमित्ताने नाम जप आणि गुरू चरित्र पारायण वाचनाने सप्ताहाची सुरुवात रविवार दि. २० एप्रिल २०२५ रोजी झाली. समाजातील अध्यात्मिक उन्नतीसह, मानसिक शांती व सदाचार वृद्धिंगत व्हावा या उद्देशाने अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुकुल पिठाचे पिठाधिश प पू गुरू माऊलीच्या आदेशाने हा सप्ताह संपन्न होत आहे.



या वेळी मोठ्या प्रमाणात सेवेकरी आणि भाविक उपस्थिती लावत आहेत. या सप्ताह काळात सेवा मार्गाच्या बालसंस्कार आणि शिशुसंस्कार विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन चे आयोजन करण्यात आले आहे. मुलांनी त्यात मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला, तसेच भारतमातेच्या संरक्षण साठी अब्जचण्डि सेवा आणि सामूहिक श्री गुरुचरित्र पारायण सेवा महिला आणि पुरुष सेवकर्यांनि मोठ्या संख्येने या सात दिवसांत रुजू करत असून श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रातर्फे ८०% समाजकार्य आणि २०% टक्के अध्यातम या संकल्पनेतून नेहमीच विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. त्यात सर्वांनी सहभागी व्हावे, तसेच सप्ताहाची सांगता २६ एप्रिल वार शनिवार रोजी महाआरतीने सकाळी १०:३० वाजता होत असून मांदियाळी स्वरूपात प्रसाद होणार असून परिसरातील सर्व सेवेकरी व भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन ही सेवा केंद्रातर्फे करण्यात आले आहे.

## आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठानचे तिसाव्या वर्षात यशस्वी पदार्पण

# आदर्श प्रतिष्ठान बनले जनसामान्यांचे केंद्रस्थान

**आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण, आनंदगांव ता. केज. जि. बीड. या संस्थेची स्थापणा २१ एप्रिल १९९६ चा वर्षी झाली. या संस्थेची स्थापणा जेष्ठ समाजसेवक, जेष्ठ विचारवंत, ख्यातनाम वक्ते, व्याख्यात्ते वसुदेव (बप्पा) गायकवाड यांनी आपल्या मित्रपरिवाराला सोबत घेवून केली. बघता बघता २९ वर्षे आज पूर्ण झाली. संस्था आज ३० व्या वर्षात पदार्पण करत आहे. अथक व सातत्यपूर्ण परिश्रम घेवून संस्थेने विविध समाज उपयोगी शास्वत विकासाची कामे केली. जल, जमीन, जंगल, जन, जानवर या पाच विषपाला प्रमाणभूत माणून संस्थेने २९ वर्षे जन कल्याणाचे कार्य केलेले आहे. १९९६ च्या काळात दळण वळणाची साधने नव्हती, धड गावा - गावाला रस्तेही धड जोडलेले रस्तेही नव्हते, पुरेसा पैसा अन मणुष्य बळही उपलब्ध नव्हते, अशा काळात १५ - १५ दिवस गांव सोडून या गावातून त्या गावाला पायी चालत जावे लागे, लाकांतच रहायचे, लोकांतच खायचे अन समाज प्रबोधनातून शास्वत विकासाची संकल्पना लोकांत रूजवायची एवढे त्या काळी सोपे काम नव्हते, त्यावेळी आताच्या सारखी प्रसिद्धी माध्यमेही फारसी नव्हती, सोशल मिडिया तर नावालाही नव्हता. अशा काळात लोकांचे प्रबोधन करणे खूप अवघड अन जोखमीचे काम होते. पण समाजसेवेचे व्रत घेतलेल्या वसुदेव (बप्पा) गायकवाड यांनी हे अग्निदिव्य अव्याहतपणे पार पाडले.**




प्रथम पर्यावरण जाणीव जागृती व कृती कार्यक्रम अगदी शाळेतील मुलांची रॅली काढून, गांवातून वृक्षदिंडी काढून, रात्री प्रबोधन, पथनाटय, सभा घेवून पर्यावरणाचे महत्व व काळाची गरज याविषयी प्रबोधन व उद्बोधन केले, त्यासाठी पर्यावरणाच्या कायेक्रमाला कृती ची जोड देण्यासाठी रोपवाटिका १०, ००० रोपांची नर्सरी स्वत: च्या शेतात नर्सरी करून, १०,००० रोपांचे मोफत वाटप करून लोकांना झाडे लावाय लावली व स्वतः ही शेतात झाडे लावली. अशाप्रकारे पर्यावरण जनजागृतीला कृती कार्यक्रमाची जोड दिली. उक्तीला कृतीची जोड दिली.

पर्यावरण संवर्धनासाठी भारतीय अनुसंधान संशोधन प्रतिष्ठाणच्या सहकार्यानेही सातत्याने पर्यावरण जाणीव जागृती व वृक्ष लागवड करून पर्यावरण संवर्धनासाठी संस्थेने खारीचा वाटा उचलला.

परसबाग प्रकल्पा अंतर्गत गांदराण बी - बीमाणे महिलांना मोफत वाटप करून परसबाग प्रकल्प वर्षानुवर्षे राबवून घर च्या घरी ताजा भाजीपाला, आरोग्यदायी व आनंददायी असा भाजीपाला घरोघर तयार होवून लोकांच्या आहारात आला त्यामुळे एका ह्ष्टीने पर्यावरण व दुसऱ्या दृष्टीने आरोग्य, तिस त्या दृष्टीने सकस आहार असा तिहेरी फायदा झाला.

गांडुळ खत प्रकल्प व सेंद्रीय शेती, लातूर जिल्हयातील रेणापूर तालुक्यात २ गांवात रोवक त्यांसाठी गांडुळखत प्रकल्प राबविला. प्रत्यक शेतकत्याला गांडूळखत तयार करण्यासाठी लोखंडी शेड तयार करून देण्यात आले, शेण, पालापाचोळा यापासून गांडूळ खत प्रकल्प सुरु झाला. खत तयार करणासाठी आवश्यक कल्चर ( गांडुळे ) वसुदेव( बप्पा गायकवाड यांनी स्वतः च्या शेतात दोन हौद बनवून, (कल्चर) गांडूळ तयार केले व रेणापूर तालुक्यातील २ गांवातील शेतकत्यांना पुरविले. शेतकयांच्या शेतातच गांडूळ खत तयार झाले व सेंद्रीय शेतीचा प्रयोग सुरु झाला. ज खर्चात गांडूळ शेती/ सेंद्रीय शेतीचा प्रयोग सुरु झाला. रासायनिक खताया वापर थांबला त्यामुळे शेतकयांचा खर्च वाचला, शेतात उपलब्ध असलेल्या रोणाचा व पालापाचोळ्याचा वापर शेतात होवू लागला, जमीनीची उत्पादकता वाढली, खर्च ज वर आला, आरोग्य सुधारले, पर्यावरण संवरणासही हातभार लागला. याप्रमाणे पर्यावरण जाणीव जागृती व कृती कामक्रम यशस्वी झाला.

निर्धूर चुल प्रकल्प केज तालुका, आंबाजोगाई तालुका, परळी तालुका, धारूर वालुका, वडवणी तालुका, माजलगांव तालुका, आष्टी तालुका आदी तालुक्यात हा प्रकल्प राबविण्यात आला. या प्रकल्पामुळे स्वयंपाक करण्या महिलांची धुरापासून सुटका झाली, आरोग्य सुधारण्यास मदत झाली व धुर न झाल्यामुळे पर्यावरण संवर्धनाला हातभार लागला.

उन्हाळी शाळा: या प्रकल्पा अंतर्गत उन्हाळ्यात सुट्टी च्या काळात सस्थेने शिक्षकांची नेमणूक करन उन्हाळयाच्या सुट्ट सुट्टीतही उन्हाळी शाळा चालवल्या पुढील वर्षाची पुर्वतयारी करून विद्यार्थांना आपल्या परिने शानदानाचे पवित्र कार्य पार पाडले. भटके - विमुक्त बालवाडी:- केज येये धारूर रोड येथील भटके विमुक्ततांच्या पालावर व बीड रोड येथील वडार वस्तीवर भटके विमुक्त बालवाडी संस्थेने सतः शिक्षकांच्या नेमणुका करून भटक - विमुक्त समाजातील लेकरांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे व ज्ञानदानाचे पवित्र कार्य केले. तसेच भटके विमुक्त समाजात शिक्षणाचा प्रचार व प्रसार करण्याचे कामही केले.

आरोग्य शिबीरे व आरोग्य जनजागृती: स्वामी रामानंद तीर्थ महाविघालय व रुग्नालय आंबाजोगाई व केज येथील तालुका रुग्नालय, व उपजिल्हा रुग्नालय यांच्या सहकार्याने रक्तदान शिबीर, नेत्र तपासनी शिबीर, सर्व रोग निदान शिबीर, आरोग्य शिबीर आदी उपक्रम राबवून आरोग्याच्या क्षेत्रातही भरीव काम केलेले आहे. तसेच जिवन अमृत सेवा प्रकल्पासाठी बीड जिल्हयासाठी एकाच स्वयंसेवी संस्थेची निवड झाली होती ती संस्था म्हणजे आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण आनंदगांव ता. केज. जि. बीड होय. नंतर संस्थेने पत्र देवून हे बंद केले.

ग्रामस्वच्छता अभियान:- संस्थेने गावागावात संत गाडगेबाबा ग्रमस्वच्छता अभियान राबविले, गांवोगांवी प्रबोधन केले. केज तालुक्यातील मोटेगांव येये ही ग्रामपंचायत च्या सहकार्याने भरीव काम केले. संत गाओबाबा ग्रामस्वच्छता अभियानात या गावाला राष्ट्रपती पुरस्कार मिळाला.

पंचायत राज व ग्रामसभा सक्षमीकरण:- महिला राजसत्ता आंदोलनाच्या सहकार्याने गांवागांवात पंचायतराज व ग्रामसभा सक्षमीकरण यावर काम केले. ग्रामदभेचे कामकाज व लोकसहभाग यावर मार्गदर्शन, प्रबोधन केले. पंचायतराज यावर ही प्रबोधन केले.बऱ्यापैकी प्रबोधन झाले.

दुष्काळ मुक्ती परिषदा व मागदर्शन:- हाताला काम नाही, पियाला पाणी नाही, खायाला अन्न नाही, जनावरांना चारा नाही, सिंचनला पाणी नाही. याला दुष्काळ म्हणतात. यात अशावेळी शारानाने जबाबदारी घेवून लोक सहभागातून दुष्काळ निर्मूलनाचे काम करावे यासाठी सातत्याने काम केलेले आहे.जनावरांच्या छावण्या, रोजगार हमीची कामे, पि याला पाणी, सिंचनाला पाणी यासाठी सातत्याने प्रयत्न केले, जनजागृतीही केली. दुष्काळावर कायमखरूपी पर्याय म्हणून जल, जमीन, जंगल, जन, जनावर या घटकांना आधारभूत मानून काम केले पाहिजे यासाठी जनजागृती केली.

भुजल कृती आराखडा:- भुजल कृती आराखडा तयार करून जमीनीचा स्तर, खडकाचा स्तर बघून काम केल्यास निश्चित भुजल पातळी वाढेल, यासाठी शिबीरे, व लोकांचे प्रबोधन कले.

विहीर, बोअरवेल पुनर्भरण:- पाणी पातळी वाढण्यासाठी शेतकर्यांनी, लोकांनी विहिर, बोअरवेल, इतरही पाण्याच्या स्त्रोतांचे पुनर्भरण करणासाठी सातत्याने प्रबोधन व उद्बोधन करण्यात आले.

वेठबिगार मुक्ती, बालकामगार मुक्ती साठी,जनजागृती व कायदेविषयक प्रीक्षणे घेवून प्रबोधन करण्यात आले.

ऊसतोड कामगार सव्हेक्षण व कायदे विषयक जनजागरण:- ऊसतोड कामगारांचे सव्हेक्षण व कायदेविषयक जनजागरण नियमीत करण्यात येते.

समाजसेवा शिबीरे व स्वयंरोजगार मार्गदर्शन शिबीरे:- समाजसेवा रिबीरे व स्वयंरोजगार मार्गदर्शन शिबीरे घेवून सुशिक्षीत बेरोजगांगांना प्रशिक्षण देवून रोजगाराभिमुख बनविण्याचे कार्य केलेले आही.

विवाहपूर्व समुपदेशन व विवाहपश्चात समुपदेशन:- कॉलेज स्तरीय युवक - युवतीसांठी विवाहपूर्व समुपदेशन वं विवाहितां साठी विवाह पश्चात समुदेश केले जाते.

महिला सक्षमीकरण:- स्वयंसहाय्यता समुहाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण १९६ पासून प्रक्रिया चालु आहे. रमाई महिला सक्षमीकरण योजना, अँड ऑन अ क्टीव्हीटी, व इतरही उपक्रमाच्या माध्यमातून महिलांना सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक राजकीय, औद्योगिक दृष्ट्या सक्षम करण्याचे कार्य स्वयं सहाय्यता समुहाच्या माध्यमातून सातत्याने व नियमीतपणे चालू आहे.

शेतकरी मंडळ:- शेतकरी गट तयार करून ते गट बँकेला जोडून शेतकरी सक्षम करण्याच्या दृष्टीने के लेले कार्य आहे.

पाणी पुरवठा योजना:- सन २००२ - २००३ च्या दरम्यान मौजे साबला ता. केज. जि. बीड येथे पिण्याचा पाण्यासाठी जी. टी. झेड जर्मन सरकारच्या ९० % सहभागातून व महिलांच्या स्वयंसहाय्यता समुहाच्या १० % सहभागाती हि योजना राबविण्यात आली. बाऊर बल पाण्याच्या टाक्या, पाईपलाईन, हातपंप इत्यादी सरूपाचे काम गावकर्यांच्या सहकार्याने करून पाणीपुरवठा योजना यशस्वी राबविली ज्याचा पिण्याच्या पाण्याचा फायदा गांवाला झाला.

पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम:- मौजे घाटेवाडी ता. केज. जि. बीड मने २००३ - २००४ च्या दरम्यान जी. टी. झेड जर्मन सरकारच्या सहकार्याने पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबविण्यात आला. याअंतर्गत मातीचे बांध, गडाचे बांध, सी. सी. टी, जल शोषक चर, गवत लागवड व इतर विविध उपचार करून शिवारात पडणारे पापसाचे पाणी शिवारातच अडविण्यात आले. डोंगराच्या माथ्या कडून पायथ्याकडे विविध उपचार करण्यात आले.

गांवपातळीवर गांवक त्यांची एक समिती संस्थेने लोकसहभागातून तयार केली. कामाचे मोजमाप या समिती समोर होत असे. अगदी कामावर काम केलेल्यांचा पगारही चावडीत ग्रामसभा घेवून सर्वांसमोर वाटप होत असे. ९० % जी. टी. झेड, जर्मन सरकारचा वाट तर १०% लोकांचे श्रमदान असे. कमाल ३ .५ वर्षाचा कामाचा कालवधी होता, मात्र अवघ्या ९ महिण्यात लोकांच्या सहकार्यामुळे संस्थेला काम करणे शक्य झाले.

संस्थेला मिळालेले शासकीय पुरस्कार:-

१. जिल्हा संस्था पुरस्कार - २०० १ - नेहरू युवा केंद्र, बीड - (खेळ व क्रिडा मंत्रालय, भारत सरकारचा उपक्रम) हस्ते: तत्कालीन जिल्हाधिकारी आनंद लिमये यांच्या हस्ते देण्यात आला.- जिल्हयातून एका संस्थेला देण्यात येणारा

२. सर्वोत्कृष् संस्था व्यवस्थापण पुरस्कार:- मराठवाडा विभागातून एका संस्थेला देणात येणारा.-२ ०० ७ हस्ते तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते - नागपूर येथे देवात आला.

जिल्हा समन्वय म्हणून कार्य:-

१.माविम - स्वयंसेवी संस्थेची जिल्हा समन्वय संस्था म्हणून कार्य.

२. महिला राजसत्ता आंदोलन जिल्हा समन्वय संस्था म्हणून कार्य.

३. मराठवाडा लोकविकास मंच:-जिल्हा समन्वय संस्था म्हणून कार्य

# चराई अनुदानापोटी ७.३३ कोटी रुपये मेंढपाळांच्या थेट बँक खात्यात जमा

## पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांची माहिती; चराई अनुदानाचा मेंढपाळ कुटुंबाना होतोय मोठ्या प्रमाणामध्ये फायदा

मुंबई । प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या वतीने राज्यातील भटक्या जमाती (भज-क) या प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजातील ३०५४ मेंढपाळांना सन २०२४-२५ या वर्षासाठी चराई अनुदानापोटी सुमारे ७.३३ कोटी अनुदानाचे थेट हस्तांतरण (डीबीटी)द्वारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहेत. मेंढ्यांच्या चराई करिता राज्यातील मेंढपाळांना अर्थ सहाय्य उपलब्ध झाल्यामुळे मेंढपाळांना शाश्वत उत्पन्नाचा स्रोत्र निर्माण झालेला आहे आणि त्यांच्या आर्थिक प्रगतीस हातभार लागला असल्याची भावना पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये मेंढीपालन व्यवसाय हा पूर्णपणे स्थलांतरित पद्धतीने केला जातो. पावसाळी हंगामामध्ये मेंढपाळ त्यांच्या मूळ गावी परत आल्यानंतर पावसाळ्यात जून ते सप्टेंबर या कालावधीमध्ये मेंढ्यांना चराई करिता क्षेत्र उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होतात. त्यामुळे चाऱ्या अभावी मेंढ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन त्यांची उत्पादकता कमी होऊन मेंढपाळ कुटुंबाचे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे राज्यामधील मेंढपाळ कुटुंबाना माहे जून ते सप्टेंबर या कालावधीमध्ये मेंढ्यांसाठी चाऱ्याची कमतरता भरून काढण्यासाठी चराई अनुदान देण्याची योजना पशुसंवर्धन विभाग व इतर मागासवर्गीय विभाग यांच्या मार्फत राबविली जात असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.

राज्यामध्ये या योजनेसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळामार्फत ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आलेले असून त्यामध्ये लॉटरी पद्धतीने संगणकीय प्रणालीद्वारे त्यांची निवड यादी तयार करण्यात आलेली होती. जिल्हा व तालुका निहाय धनगर व तत्सम मेंढपाळांची संख्या विचारात घेऊन जिल्हा व तालुका निहाय लक्षांक देण्यात आलेले होते. त्यामधून पात्र मेंढपाळ कुटुंबाना माहे जून ते सप्टेंबर या चार महिन्याच्या कालावधीसाठी प्रति माह ६ हजार रुपये असे एकूण २४ हजार रुपये चराई अनुदान देण्यात आले आहे.

चराई अनुदान मिळाल्यामुळे मेंढपाळ कुटुंबाना त्यांच्या मेंढ्याकरिता चारा उपलब्ध झाल्याने मेंढ्यांच्या आरोग्यामध्ये सुधारणा होऊन मेंढपाळाच्या आर्थिक उत्पन्नामध्ये भर पडत आहे. या योजनेद्वारे राज्यामधील ३०५४ लाभार्थींना रु. ७.३३ कोटी अनुदान थेट लाभधारक हस्तांतरण (ऊइढ) द्वारे लाभार्थींच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात आलेले आहे.



# गरीब जनतेच्या नावाखाली पैसे घेऊन बीड तालुका कामगार मंडळाचे हात बरबटलेले : प्रा.सापनकर

बीड । प्रतिनिधी

बीड तालुका कामगार सेतू केंद्रातील कर्मचाऱ्याकडून वृद्ध महिलांना अरे रवीच्या भाषेमध्ये बोलण व जिल्हा कामगार अधिकारी श्री श्रीहरी मुंडे व कामगार मंडळाचे राज्याचे सचिव विवेक कुंभार हे पाठराखण करतात म्हणून हे खालाचे कार्मचारी जनता चा गैरफायदा घेतात व असं बोलतात कि सचिव आमचं जवळ नातलग आहेत त्या मुळे आमचं कोणी काही करू शकत नाही श्री प्रवीण सुरवसे व तुषार कुंभार नामक कंत्राटी कर्मचारी येणाऱ्या वृद्ध कामगारांसोबत अतिशय उद्धटपणे वागतात तरी पण जिल्हा कामगार अधिकारी काही करू शकत नाही कारण श्री श्रीहरी मुंडे मानतात कि हे दोघांच्या विषय मला बोलू नका हे सचिवांचे माणसं आहेत गोरगरीब जनतेचे पैसे घेऊन अरेरावीची भाषा बोलतात बीड जिल्हा मध्ये कामगार मंडळ यांच बोगस कारभार चालू आहे.

साहित्य वाटप करताना पैसे घेईयचं रिनवल करायचा असेल तरी पैसे घेईयचं सर्रासपणे भोंगळा कारभार सुरू आता पर्यंत खुप लोकांनी तक्रार करून सुद्धा काही केले नाही जिल्हाधिकारी साहेबांना अनेक निवेदन देऊन सुद्धा या कर्मचाऱ्यांना फारक पडत नाही कंत्राटी कर्मचारी पासून जिल्हा कामगार अधिकारी व सचिव ना पैसे भेटतात म्हणून या वयोवृद्ध माणसांना आपण माय मायबोलीप्रमाणे वागवतो. मानसन्मान करतो. पण आज बीडमध्ये वातावरण एवढंच चिघळलेला असताना. त्यांना सुद्धा वर या घाणेरड्या वर्तणूक केला सामोर जावं लागतं. आई बहिणीवर शिव्या देतात. पैसे खाल्ल्याशिवाय एकही काम किंवा एकही कागद पुढे सरकवला जात नाही. म्हणजे गरिबांचे काम राहिली बाजूला. प्रत्येक कागदा माग यांचे पन्नास शंभर रुपये घेतल्याशिवाय कागद पुढे सरकत नाही. तो कागद कमीत कमी सात-आठ जणांच्या हाताखाली जात असतो. म्हणजे एखादं छोट्यातल्या छोटं काम करायचं म्हटलं तरी कचेरीत जाताना हजार रुपये तरी खिशात घेऊन जात जावे. गरीब माणूस इथे तीनशे रुपये रोजावर कामाला जातोय आणि गरिबांच्या ह्या सुविधा का गरिबांना सुविधांच्या आणि योजनांच्या आधारे लुटले जाते नुसते लुटले जाते असे नाही तर त्यांना अपमानित होऊन काम करून घ्यावे लागते. तरीही कुंभार आणि सुरवसे यांना जनसामान्याचे काही पडलेले नसतं. अपमान झालेला वृद्ध किंवा महिला हवालदिल होऊन अगदी काम नको किंवा जीव नको या भूमिकेवर ठाम होतात. आतापर्यंत कंत्राटी कामगारांनी किती जणांची फसवणूक केलेली आहे हे सांगू शकत नाही. पण जनसामान्यांना न्याय करून देणार त्यासाठी आम्ही एकजुटीने लढत आहोत. आमचा आवाज हा फक्त जनतेसाठी आहे. आम्हाला न्याय मिळावा. म्हणून आम्ही सदैव जनतेसाठी तत्पर आहोत. जर यावर लवकरच योग्य तो निर्णय नाही दिला तर बीड जिल्हाधिकारी कार्यालय समोर उपोषण केल्या शिवाय राहणार नाही असं इशारा प्रा बाळासाहेब सापनकर सर राष्ट्रीय समाज पक्ष बीड जिल्हा यांनी दिला आहे.

# सरपंच ॲड. गणेश मोरे यांना महाराष्ट्र भूषण सन्मान पुरस्कार जाहीर

## बीड जिल्ह्यात जनतेतील कमी वयात सरपंच झालेला म्हणून ओळख

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील वडगाव कळसंबर येथील सरपंच ॲड. गणेश आसाराम मोरे यांनी गावातील विविध विकास कामे केले आहेत. आदर्श सरपंच म्हणून त्यांची परिसरात ओळख निर्माण झाली आहे. गोरगरिबांच्या मदतीला धावून जाणारा हा गणेश सतत लोकांच्या सेवेत असतो.



ॲड. गणेश मोरे यांना महाविद्यालयीन जीवनापासून सामाजिक कार्य करण्याची आवड असून ते नेहमीच समाजकार्यासाठी अग्रस्थानी असतात. गावचे प्रथम नागरिक म्हणून ते उत्तमपणे आपले कार्य करत असल्याने ग्रामस्थ त्यांच्या कार्यपद्धतीवर समाधानी आहेत. ते करत असलेल्या कामाची दखल घेत युवा महाराष्ट्र फाउंडेशन यांनी महाराष्ट्र भूषण सन्मान पुरस्कारसाठी निवड केली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना युवा महाराष्ट्र फाउंडेशन यांनी महाराष्ट्र भूषण २०२५ चा सन्मान पुरस्कार जाहीर केलेला आहे. यामध्ये अनेक दिग्गजांचा सन्मान सोहळा पार पडणार आहे. पुरस्कार वितरण २३ एप्रिल २०२५ रोजी दुपारी बारा वाजता पार पडणार आहे. पुरस्कार वितरणासाठी पूजा राठोड अभिनेत्री, इलक्षी गुप्ता अभिनेत्री तानाजी चित्रपट, हसीनी सुधीर अभिनेत्री साउथ चित्रपट, रुचिरा जाधव अभिनेत्री लागीर प्रेमाचं, या पुरस्कार सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहे. ॲड. गणेश मोरे यांची सरपंच पदाची दुसरी टर्म असून जनतेतील सरपंच पदाच्या पहिल्या निवडणुकीमध्ये गणेश मोरे बीड जिल्ह्यातील कमी वयात पहिल्या वेळेस जनतेतून सरपंच झालेला मुलगा म्हणून ओळख निर्माण झालेली आहे. आता सध्या त्यांच्या मातोश्री सुशाला आसाराम मोरे या सरपंच आहेत. गणेश मोरे यांची ओळख मेटे साहेबांचा कार्यकर्ता म्हणून निर्माण झालेली आहे. पुरस्कार जाहीर झाल्यामुळे गणेश मोरे यांचे अभिनंदन आणि कौतुक परिसरातून नव्हे तर बीड जिल्ह्यामधून होत आहे, त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होताना पाहायला मिळत आहे.

स्वच्छतेच्या उद्देशाने नाली बांधकाम, गटारी योजना, प्रवाहाप्रमाणे नळ पाणीपुरवठा योजना राबवली, गावच्या स्वच्छतेच्या अनुषंगाने गावातील प्रत्येक घरासमोर शोषखड्डे नियोजन करण्यात आले आहे. गावामधील पाणी असेल ते त्याच ठिकाणी मुरून पाणी पातळी वाढण्यासाठी मदत होते यासाठी त्यांनी अनेक विविध विकास कामे तसेच योजना सुद्धा राबवल्या आहेत. आदर्श ग्रामपंचायत त्यांनी निर्माण केलेली आहे. हा गौरव बीड जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानास्पद असून, इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी, सरपंचासाठी प्रेरणादायी ठरणारा आहे.

# अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी दत्तात्रय नरनाळे

बीड । प्रतिनिधी

अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे कार्य हे देशभर चालू असून पत्रकारांच्या प्रश्नावर आवाज उठवणारी आणि न्याय हक्कासाठी लढणारी एकमेव संघटना असून या संघटनेच्या बीड जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे यांची संस्थापक अध्यक्ष मनोहरजी सुने साहेब प्रदेश अध्यक्ष कैलासबापू देशमुख मराठवाडा अध्यक्ष जगदीश बुलबुले, मराठवाडा उपाध्यक्ष अनिल कुलकर्णी यांच्या सूचनेवरून बीड जिल्हाध्यक्ष अशोक होळकर यांनी ही निवड केली आहे.



पत्रकारांच्या प्रश्नावर आवाज उठवणारी ही अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटना देशभर कार्यरत असून दिवसेंदिवस या संघटनेची व्याप्ती वाढत असून बीड जिल्ह्यात देखील या संघटनेच्या माध्यमातून जिल्हाध्यक्ष अशोक होळकर हे पत्रकारांच्या प्रश्नावर आवाज उठवत आहेत ,संघटनेची मजबूत बांधणी करण्यास सुरुवात झाली असून नुकतीच जिल्हा कार्याध्यक्ष पदाची जबाबदारी दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे यांच्यावर देण्यात आली असून वरिष्ठांच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्ष अशोक होळकर व मराठवाडा उपाध्यक्ष अनिल कुलकर्णी यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# आझाद क्रांती सेनेचा बीड येथे होणार महामेळावा

बीड । प्रतिनिधी

आझाद क्रांती सेना ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा आणि चळवळ पुढेनेणारी महाराष्ट्रातील धडाडीची संघटना आहे. उत्तर प्रदेशमध्ये चंद्रशेखर आझाद यांची 'भीम आर्मी सेना' ताकतीने काम करत असून त्याच धर्तीवर महाराष्ट्रतही त्याच पद्धतीने 'आझाद क्रांती सेना' काम करते. युवावर्ग मोठ्या संख्येने या सेनेचा सदस्य होताना दिसत आहे. कमी कालावधीमध्ये आपल्या कामाच्या जोरावर लोकप्रियता मिळवलेले सेनाप्रमुख राजेश घोडे यांचीच ही किमया म्हणावी लागेल. याचाच एक भाग म्हणून जिल्ह्यात त्यांच्या कार्यक्रमाची मालिका वाढलेली दिसून येत आहे.

दि.२५/४/२०२५ रोजी सकाळी दहा वाजता बार्शीनाका येथून भव्य मोटारसायकल रॅलीची सुरुवात होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन येथे रॅली चे रूपांतर सभेत होईल. सूत्रांच्या माहितीनुसार या मेळाव्यामध्ये दोनशे युवा कार्यकर्त्यांचा जाहीर समावेश आझाद क्रांती सेनेत होणार असल्याचे समोर आले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन बीड येथील नानासाहेब भिसे, कृष्णाजी पाटोळे व राजेशजी कांबळे यांनी केले असून या कार्यक्रमास माजलगांव, केज, धारूर, वडवणीसह इत्तर तालुक्यातून देखील बरेच कार्यकर्ते येणार आहेत.

# बांधकाम कामगारांना सर्व योजना मोफत

बीड । प्रतिनिधी

कोणी या योजना मिळवून देण्या साठी पैशाची मागणी करत असेल तर भाजप कामगार मोर्चा हेल्पलाईन ला संपर्क करा. महाराष्ट्र इमारत बांधकाम कामगार कल्याण व इतर बोर्ड अंतर्गत कामगारांना सामाजिक, आर्थिक, आरोग्या च्या काळजी साठी,कामगारांना त्यांच्या मुलांच्या शिक्षण विवाह व सुरक्षा संदर्भात अनेक योजना आहेत.व त्या मोफत आहेत. परंतु सध्या कामगारांच्या मुलांच्या मंजूर स्कॉलरशिप मधून ५०% रक्कम वसुली केली जात असल्याच्या तोंडी तक्रारी भाजपा कामगारा मोर्चा कडे प्राप्त होत आहेत. तसेच मिळणाऱ्या प्रत्येक लाभाला आवास्तव रकमेची मागणी होत आहे.





महाराष्ट्र इमारत बाधकाम कामगार महामंडळा मधे जे कामगार नोंदणी करतात त्यांना विविध योजनांच्या माध्यमातून सरकार लाभ देते,पण सध्या बीड सह संपूर्ण महाराष्ट्रात याच योजना राबवत असताना इजउथ चे कर्मचारी विविध कामगार संघटनेचे पदाधिकारी असल्याचे भासवून एजंट हे ५०% रक्कम लाभार्थीकडुन वसुल करत आहेत. बोगस नोंदणी साठी १००० ते १५०० रूपये, कामगारांना सुरक्षा संच (पेटी)घेण्यासाठी २००० रूपये,घरगुती किचन सेट साठी २५०० ते २५०० रुपये वसुले होते. प्रत्येक कामगारांसाठी येणाऱ्या योजनेसाठी दर फिक्स आहेत.

हि चोरी व वसुली रोखण्यासाठी भाजपा कामगार मोर्चा च्या वतीने आम्ही हेल्पलाईन नंबर देत आहोत त्यावर कोणी पैसे मागत असल्यास संपर्क साधावा. श्री.दादासाहेब नन्नवरे, प्रदेश सरचिटणीस, भाजपा कामगार मोर्चा, ओमप्रकाश गिरी बीड जिल्हा अध्यक्ष, भाजपा कामगार मोर्चा हे असेच प्रकार बंद करण्यासाठी भाजपा कामगार मोर्चा च्या पदाधिकारी यांनी कामगार मंत्री आकाश फुंडकर यांची भेट घेतली आहे. राज्यभरात भाजप कामगार मोर्चा चे प्रदेश अध्यक्ष विजय हरगुडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली टास्क फ़ोर्स ची निर्मिती करण्यात आली आहे. कोणी आर्थिक मागणी करत असेल तर बीड जिल्ह्यातील कामगार मोर्चाचे जिल्हाध्यक्ष व प्रदेश सरचिटणीस यांना संपर्क साधा असे श्री.दादासाहेब लक्ष्मण नन्नवरे प्रदेश सरचिटणीस, भाजपा कामगार मोर्चा महाराष्ट्र यांनी केले आहे.

# कै.वसंतराव नाईक आश्रमशाळेच्या आदित्य जाधवने पटकावले रौप्यपदक



अंबाजोगाई । प्रतिनिधी

राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत ग्रीको-रोमन कुस्तीच्या ४८ किलो वजनी गटात अंबाजोगाईच्या कै.वसंतराव नाईक प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, आनंदनगर येथील इयत्ता ९ वी वर्गातील विद्यार्थी खेळाडू आदित्य दिलीप जाधव याने ऐतिहासिक कामगिरी करीत रौप्यपदक पटकावून शाळा, जिल्हा आणि महाराष्ट्राचा गौरव वाढविला आहे.

छत्रसाल स्टेडियम, दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत आदित्यने प्राप्त केलेल्या यशा बद्दल शाळेचे संस्थापक सचिव अनिल राठोड प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक एस.आर.राठोड, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक एस.ए.राठोड व क्रीडा शिक्षक प्रविण उत्तमराव ठोंबरे, जि.एस.राठोड व बी.बी.राठोड संस्थेचे सचिव, जलील शेख (प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक विभाग), छत्रपती संभाजीनगर.) डी.बी.क्षीरसागर (सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय. बीड.), शेख चाँद (गटशिक्षणाधिकारी) अरविंद विद्यागर (जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड.) क्रीडा मार्गदर्शक प्रविण ठोंबरे व जि.एस.राठोड आदींनी अभिनंदन केले आहे.

# माजी आ.अमरसिह पंडित यांच्या प्रयत्नामुळे पोईतांडा येथे स्वतंत्र ग्रामपंचायत

## आ.विजयसिंह पंडित यांनी आश्वासनपूर्ती केल्याबद्दल ग्रामस्थांनी मानले आभार

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायतीचे विभक्तीकरण करून पोईतांडा या स्वतंत्र ग्रामपंचायतीची स्थापना करणे बाबतचे अधिकृत अधिसूचना शासन राजपत्रात प्रकाशित झाली आहे. त्यामुळे आनंदवाडी, पवारमळा, चाहूर तांडा आणि देवीतांडा यांची एकत्रित पोईतांडा ही नवीन ग्रामपंचायत अस्तित्वात आली आहे.



याबाबत माजी आ. अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली आ. विजयसिंह पंडित यांनी प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा केला होता. बंजारा तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे आश्वासन आ. विजयसिंह पंडित यांनी निवडणुकीत दिले होते.. आश्वासपूर्ती केल्याबद्दल पोईतांडा ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले आहेत. जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी गेवराई विधानसभा मतदार संघातील बंजारा तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायत मिळवून देण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळे आजवर बालानाईक तांडा, गैबीनगर तांडा, जयराम तांडा, वसंतनगर तांडा आणि बाराभाई तांडा या तांड्यांना यापूर्वी स्वतंत्र ग्राम पंचायत मिळालेली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आ. विजयसिंह पंडित यांना आमदार होताच पहिल्या शंभर दिवसांत तलवाडा ग्रामपंचायतीचे विभक्तीकरण करून पोईतांडा येथे स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यात यश आले आहे. विधानसभा निवडणुकीच्या जाहिरनाम्यात आ. विजयसिंह पंडित यांनी बंजारा तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायत देऊन लमाण समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे आश्वासन दिले होते. आमदार झाल्यानंतर पहिल्या शंभर दिवसांत आ. विजयसिंह पंडित यांच्या पाठपुराव्यामुळे पोईतांडा येथे नवीन स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन झाली आहे. त्यांच्या आश्वासनपुर्ती मुळे ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले.

या बाबत बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, गेवराई विधानसभा शासनाने अधिकृत अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द केली आहे. त्यानंतर ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला. तलवाडा ग्रामपंचायतीचे विभक्तीकरण करून तलवाडा, राजुरीमळा व रामनगर यासाठी तलवाडा आणि पोईतांडा, आनंदवाडी, पवारमळा, चाहूरतांडा व देवीतांडा यांसाठी पोईतांडा अशा दोन ग्रामपंचायती अस्तित्वात आलेल्या आहेत. जय भवानी कारखान्याचे संचालक डॉ. आसाराम मराठे, उपसरपंच अक्रम सौदागर, ग्रामपंचायत सदस्य विठ्ठल चव्हाण, पत्रकार विष्णु राठोड, लहू जाधव, तुकाराम चव्हाण, गणपत चव्हाण, गोपीनाथ चव्हाण, मगन चव्हाण, मोहन चव्हाण, गुलाब राठोड, देविदास पवार, अंकुश पवार, अर्जुन पवार, रामेश्वर पवार, राहुल पवार, भाऊसाहेब पवार, धनसिंग पवार, गोरख पवार, दौलत राठोड, बाबू राठोड, अशोक चव्हाण, उध्दव गायकवाड, कैलास पवार, गणेश जाधव, दिगांबर राठोड, महादेव राठोड, कृष्णा राठोड, श्रीराम राठोड, विठ्ठल महाराज, अंबादास राठोड, अनिल राठोड, बन्सी चव्हाण, प्रल्हाद चव्हाण, अनिल चव्हाण, गोपीनाथ चव्हाण, शामराव चव्हाण, गुलाब चव्हाण, सेवानिवृत्त विस्तार अधिकारी बळीराम राठोड, धनसिंग चव्हाण, ओंकार चव्हाण, प्रकाश चव्हाण यांसह आदींनी जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांची भेट घेऊन आभार मानले.

# लाखो रुपयांची बिले गुत्तेदाराने घशात घालत शिंपेटाकळी जलजीवनचे काम केले ठप्प

## जीवने साहेब चौकशी करून कारवाई करणार का ?

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील शिंपेटाकळी येथे जलजीवन या पाणीपुरवठा योजनेचे काम गत दोन वर्षांपूर्वी पासून सुरू आहे मात्र या कामाचा दर्जा अतिशय निकृष्ट आहे निकृष्ट करत असलेले काम आज पर्यंत गुत्तेदाराने पूर्णत्वास नेले नाही बिले मात्र लाखो रुपयाची उचलली आहेत. या संबंधित अनेक तक्रारी करून देखील कुठलीही कारवाई या गुत्तेदारावर झाली नाही.

ग्रामीण भागातील नागरिकांना दररोज व शुद्ध पाणी मिळावे यासाठी केंद्र सरकारने जलजीवन मिशन योजना प्रभावी राबवण्याची नियोजित केले होते परंतु माजलगाव तालुक्यामध्ये जल जीवन योजना गुत्तेदाराने गिळंकृत करण्याचं काम केलं आहे. यामध्ये तालुक्यातील शिंपेटाकळी येथे जल जीवन मिशन अंतर्गत एक कोटी १९ लाख रुपये चा निधी उपलब्ध करण्यात आला परंतु गत दोन वर्षांमध्ये फक्त पाईपलाईन खोदण्यात आली आहे ती देखील प्रत्येक घरापर्यंत पोहोचली नाही.




**हर घर नळ ही योजना फक्त नावाला**

केंद्र सरकारने प्रत्येक घराला नळ कनेक्शन देऊ असे प्रत्यक्षात सांगितले असतील तरी देखील शिंपेटाकळी मध्ये असं कुठल्याही प्रकारचे नळ कनेक्शन अद्याप पर्यंत देण्यात आलेले नाही शिंपेटाकळी ग्रामपंचायत अंतर्गत सिद्धेश्वर नगर व कल्याण नगर या ठिकाणी असलेल्या प्रत्येक जिल्हा परिषद शाळा अंगणवाडीत देखील नळ कनेक्शन देण्यात आलेले नाही.

**संबंधित कामाचा फलक घेऊन गुत्तेदार मोहिते पळाला**

शिंपेटाकळी जलजीवन मशीन कामाचा फलक फक्त फोटो काढण्यासाठी लावला गेला होता परंतु फोटो काढतात संबंधित कामाचा माहिती फलक घेऊन गुत्तेदार फरार झालेला असून अद्याप पर्यंत आलेला नाही.

**काम कमी आणि अधिक बिल उचलण्याची घाई कशाला**

शिंपे टाकळी मध्ये आत्तापर्यंत आत्तापर्यंत काम कमी आणि बिले जास्त उचलण्याची घाई झालेली दिसते फक्त सिद्धेश्वर नगर आणि कल्याण नगर गावापर्यंत पाईपलाईन येण्याचं काम करून अर्धवट विहीर खोदून बिले मात्र उचलण्याचे काम केले आणि अधिकचे काम दाखवण्यासाठी जुन्याच विहिरीचा व टाकीचा वापर तर केला नाही न.

> शिंपेटाकळी ग्रामपंचायतची सदस्य म्हणून मी व माझ्या इतर सहकारी सदस्यांनी संबंधित कामाची तक्रार वारंवार केलेली आहे परंतु यामध्ये कसलीही कारवाई झालेली नाही सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू असून गावाला पिण्यासाठी पाणी मिळणे आवश्यक आहे सदर कामाची चौकशी करण्यात यावी व काम चांगल्या दर्जाचे व्हावे यासाठी वेळप्रसंगी आम्ही न्यायालयात देखील जाऊ
>
> **–कविता कुंडकर**
> ग्रामपंचायत सदस्य शिंपेटाकळी

**जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जिवने साहेब आपण लक्ष घालावे**

शिंपेटाकळी जीवन मिशन अंतर्गत चालू असलेल्या कामांमध्ये अत्यंत कार्यक्षम असल्याने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी लक्ष घालून चांगल्या दर्जाचे काम करण्याचे आदेश द्यावेत.




# पहलगाम येथील भ्याड अतिरेकी हल्ल्याच्या निषेधार्थ लिंबागणेश येथे निदर्शने

लिंबागणेश । प्रतिनिधी

जम्मू –काश्मिरच्या पहलगाम मधील मिनी स्वित्झर्लंड म्हणून ओळखले जाणारे बैसरण खोरे येथील निसर्गरम्य परिसरात पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांवर पाक धार्जिणे अतिरेक्यांनी बेछुटपणे गोळीबार करत हल्ला केला.या भ्याड हल्ल्यात २८ पर्यटक मृत्युमुखी पडले असुन अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. या हल्ल्यानंतर देशभर पाकिस्तान विरोधात संतापाची लाट उसळली असून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२४ गुरुवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे भ्याड अतिरेकी हल्ल्याच्या निषेधार्थ निदर्शने करण्यात आली.

यावेळी हिंदू –मुस्लिम भाई भाई म्हणत पाकिस्तान मुर्दाबाद हल्लेखोरांना फाशी द्या पाकिस्तान विरोधी घोषणाबाजी करण्यात आली. हल्लेखोर आणि त्यामागील सुत्रधार यांना तातडीने अटक करून फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी , पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री, राज्यपाल, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना करण्यात आली. भारत सरकारने पाकिस्तान विरोधात घेतलेल्या सिंधू पाणी वाटप करार रद्द, अटारी सिमेवरील तपास नाका बंद, पाकिस्तानी नागरीकांना व्हिसा नाही, उच्चायुक्तालयातील लष्कर, नौदल आणि हवाई सल्लागार पदे रिक्त आदी निर्णयांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, अँड. गणेश वाणी, अशोकराजे वाणी, महादेव कुदळे, शेख शफीभाऊ, समीर शेख, कैलास काटे, बालाजी निर्मळ, शंकर निर्मळ, हरिओम क्षीरसागर, सुरेश निर्मळ, कचरू रणखांब, अमोल वक्ते, भगवान मोरे, आश्रुबा गिरे, संतोष भोसले, नाना वाणी, जनार्दन वाणी, राजेंद्र वायभट आदी ग्रामस्थ सहभागी होते.



बीड – धानोरा रोड येथे घाणीचे साम्राज्य पसरले आहे, त्यामुळे रोगराई पसरण्याची शक्यता आहे. नगर पालिका प्रशासनाकडून स्वच्छता करावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# शाळा आणि शिक्षणाची गोडी सफा ने बालपणातच दाखवली

## अंगणवाडी ताईंनी सफा सह आजीच्या केलेल्या सत्काराची सर्वत्र चर्चा

बीड । प्रतिनिधी

आपल्याकडे एक म्हण आहे 'बाळाचे पाय पाळण्यात दिसतात' ही म्हण कागज़ी दरवाज़ा येथे आजोळ असणाऱ्या बार्शी च्या सफा मोमीन या तीन वर्षीय चिमुकलीने दाखवून दिले. यामुळे तिचे तिच्या आजीसह अंगणवाडी ताईंकडून हार, पुष्पगुच्छ आणि मिठाई देऊन सत्कार करण्यात आले. याची चर्चा सर्वत्र होऊ लागली आहे.



बीड शहरातील कागज़ी दरवाज़ा परिसरात राहणारे फरीदा–मुसा शेख यांची मोठी मुलगी फरहिन शेख ही बार्शी येथील महेदवी नगर येथे सासरी राहते. ती चार महिन्यांपूर्वी दुसऱ्या बाळंतपणासाठी आई–वडिलांकडे बीड येथे आली होती. इथे आल्यानंतर तिची तीन वर्षीय मुलगी सफा समीर मोमीन हिने तिच्या आजीला विचारले 'नानी यहाँ अंगणवाडी है क्या? यावर त्यांनी 'है ना, क्यूँ? असा प्रश्न केल्यावर तिने सांगितले 'मै हमारे वहाँ के जैसा यहाँ भी अंगणवाडी मे जाऊंगी' आणि तिने आजीकडे अंगणवाडीत जायची जिद्द केली म्हणून आजी फरीदा यांनी तिला दुसऱ्या दिवशी कागज़ी दरवाज़ा येथील अंगणवाडीत नेले. तेव्हा तिने आजीला सांगितले, 'अब तुम घर कू जाओ, छुट्टी होते वक्त लेने कू आओ' आणि अशाप्रकारे सफा येथील अंगणवाडी मध्ये गेल्या चार महिन्यांपासून न चुकता, एकही खाडा न करता दररोज गेली. थोडे लिहिणे–वाचणे ही शिकली. आता तिची आई फरहिन दुसरी प्रसूती होऊन दीड महिना झाल्यामुळे बार्शी ला सासरी जाणार असल्याने आता उद्यापासून सफा अंगणवाडीत येणार नाही असे अंगणवाडी ताईंना सफाच्या आजी फरीदा यांनी सांगितल्याने चार महिन्यांपासून दररोज न चुकता अंगणवाडीत येणारी सफा आता उद्यापासून आपल्याकडे येणार नाही म्हणून अंगणवाडी ताई नफीस रहीम यांनी अंगणवाडी सेविका तसेच सर्व अंगणवाडी मधील मुलांमुलींसमोर सफा चे पुष्पहार घालून, मिठाई देऊन तर तिच्या आजी फरीदा यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कारित केले. पाहता पाहता ही वार्ता परिसरात पसरल्याने याची जोरदार चर्चा होऊ लागली आहे.

# सनगावमधील वकील तरुणीस मारहाणीप्रकरणी आरोपी अजूनही मोकाट!

## तात्काळ आरोपींना अटक न केल्यास पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर संबळ आंदोलन करणार : वर्षा जगदाळे

बीड । प्रतिनिधी

आंबाजोगाई तालुक्यातील सनगाव येथे घडलेल्या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. गावातील वकील ज्ञानेश्वरी अंजान यांना गावातील सरपंच व त्यांच्या सहकाऱ्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना नुकतीच उघडकीस आली आहे. या प्रकरणी युसुफ वडगाव पोलीस ठाण्यात १० आरोपींविरोधात विविध गंभीर कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले असूनही, अद्याप एकाही आरोपीला अटक करण्यात आलेली नाही. मारहाणीमुळे गंभीर जखमी झालेल्या ज्ञानेश्वरी अंजान यांच्यावर सध्या बीड येथे उपचार सुरू असून, त्यांच्यासह त्यांच्या कुटुंबाला देखील जीवितास धोका निर्माण झाल्याची शक्यता आहे.



या संदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने निवेदन जिल्हा पोलीस अधिक्षकांना देण्यात आले असून, तात्काळ आरोपींना अटक न केल्यास पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर संबळ आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी मनसेचे महिला राज्य उपाध्यक्षा वर्षा जगदाळे, उपजिल्हाप्रमुख सदाशिव बिडवे, शहराध्यक्ष अमरजान पठाण, महिला जिल्हाध्यक्ष आशाताई कुटे यांनी पोलीस प्रशासनाने तातडीने कारवाई करून पीडितेला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी केली आहे.

# ग्रामीण रस्त्यांच्या विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणार : अमरसिंह पंडित

## ईटकुर जोड रस्त्यावरील १५८ लक्ष रुपयांच्या पुल बांधकामाचा शुभारंभ

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील रामा ५२ ते ईटकुर – शिंपेगाव – लोळदगाव रस्त्यावरील साखळी क्र. १ / ९१० वरील १५८.१३ लक्ष रुपयांच्या पुल बांधकामाचा शुभारंभ नारायणगडाचे मठाधिपती ह.भ.प. शिवाजी महाराज व जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या शुभहस्ते करण्यात आला. ग्रामीण भागातील रस्त्यांच्या विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न सुरु असून दळणवळणाची साधने निर्माण झाल्यास या भागाचा विकास होण्यास मदत होईल असे प्रतिपादन अमरसिंह पंडित यांनी केले. विकासाची दृष्टी अमरसिंह पंडित यांच्याकडे असल्यामुळे तेच या भागाचा विकास करू शकतील असे प्रतिपादन यावेळी ह.भ.प. शिवाजी महाराज यांनी केले. व्यासपीठावर शिंपेगाव येथील दत्त संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. हनुमान महाराज गिरी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. ईटकुर येथील अखंड हरीनाम सप्ताहाच्या सांगता कार्यक्रमाला माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी भेट देऊन उपस्थितांशी संवाद साधला.

गेवराई विधानसभा मतदार संघात अतिशय दर्जेदार विकासकामे सुरु आहेत. आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रस्त्यांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध केला जात आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत राष्ट्रीय महामार्ग ५२ ते ईटकुर – शिंपेगाव – लोळदगाव रस्त्यावरील साखळी क्र. १ / ९१० वर १५८.१३ लक्ष रुपये किंमतीच्या पुल बांधकामाचा शुभारंभ बुधवार, दि.२३ एप्रिल रोजी करण्यात आला. यावेळी नारायणगडाचे मठाधिपती ह.भ.प. शिवाजी महाराज, जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह




पंडित, दत्त संस्थान, शिंपेगावचे मठाधिपती ह.भ.प. हनुमान महाराज गिरी, ह.भ.प. धुराजी बाबा, ह.भ.प. करांडे महाराज, मादळमोहीचे सरपंच राजेंद्र वारंगे, आहेरचिंचोलीचे सरपंच विकास रकटे, माजी पं.स.सदस्य जयसिंग जाधव, दत्ता भोजगुडे, माजी सरपंच अरुण वाघमारे, उपअभियंता पोपटराव जोगदंड, नितीन विर यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. ईटकुर येथे सुरु असलेल्या अखंड हरीनाम सप्ताहाच्या सांगता प्रसंगी माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी भेट देऊन ग्रामस्थांशी सुसंवाद केला, यावेळी त्यांनी ह.भ.प. शिवाजी महाराज यांचे आशिर्वाद घेतले.

ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था सक्षम केल्यानंतर या भागातील विकास होऊ शकेल म्हणून जाणीवपूर्वक ग्रामीण रस्ते दर्जेदार करण्याचा प्रयत्न सुरु आहे. राष्ट्रीय महामार्ग ५२ पासून ईटकुर, शिंपेगाव व लोळदगाव पर्यंत रस्त्याचे काम मंजुर असले तरी भविष्यात हा रस्ता सिरसमार्ग पर्यंत जोडला जाईल त्याचबरोबर कामे दर्जेदार होतील असे प्रतिपादन जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी यावेळी केले. पंडित परिवार सातत्याने समाजाच्या सेवेत आहे, सरकार दरबारी प्रयत्न करून विकासाची कामे अमरसिंह पंडित यांच्यासारखे नेते करू शकतात, या भागातील सर्व विकासकामे त्यांच्या माध्यमातून होत असल्याचे प्रतिपादन ह.भ.प.शिवाजी महाराज यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सुधीर गाडे यांनी केले तर आभार प्राचार्य अर्जुन मासाळ यांनी मानले.

यावेळी सरपंच पांडुरंग शिंदे, सरपंच विष्णू पिसाळ, अतुल नलावडे, सुभाष एरंडे, सखाराम जाधव, सरपंच बंडू परदेशी, वैजिनाथ मासाळ, त्रिंबक ढेंगळे, वसंत ढेंगळे, चेअरमन चंद्रकांत जाहेर, माणिक मासाळ, श्रीराम मासाळ, सतिष देवकते, भागवत ढेंगळे, सुनिल ढेंगळे, मच्छिंद्र वडमारे, सतिष ढेंगळे, सिध्देश्वर जाहेर, गणेश ढेंगळे, गणेश जाहेर, अमोल लोखंडे, शहादेव ढेंगळे, अशोक ढेंगळे, पांडुरंग सिराम, संतोष सिराम, हनुमान ढेंगळे, बंडू जाहेर, विनायक मासाळ, बाबासाहेब मासाळ, मधुकर ढेंगळे, माणिकराव मासाळ यांच्यासह ईटकुर, शिंपेगाव, लोळदगाव, शहाजानपूर आदी भागातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT